. **शालेय पोषण आहार योजना :-**

विद्यार्थ्यांचे उत्तम पोषण व्हावे, प्रथमिक शाळेत पटनोंदणी वाढावी, प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची दैनंदिन उपस्थिती वाढावी, विद्यार्थ्यांनी शाळेत पूर्णवेळ उपस्थित रहावे, स्पृश्य-अस्पृश्य भेदभाव नष्ट व्हावा व शैक्षणिक गुणवत्ता वाढावी म्हणून ही योजना राबविली जाते. या योजनेअंतर्गत लातूर जिल्हयातील इ. १ ली ते ८ वी च्या एकूण २१३१ अनुदानित शाळांमध्ये इ. १ ली ते ५ वी च्या २,१९,४४६ व इ. ६ ते ८ च्या १,३५,८७२ लाभार्थ्यांना या योजनेअंतर्गत चांगल्या प्रतीचा पोषण आहार देण्यात येत आहे.